महाराष्ट्र शासन
**प्रवेश नियामक प्राधिकरण**

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२२/प्र.क्र. १९६/प्रनिप्रा/३१जाने./इतिवृत्त/२३८ दिनांक : 09 FEB 2023

# बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दिनांक ३१ जानेवारी, २०२३ रोजी दुपारी १२:३० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **६९व्या** बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या वतीने डॉ. प्रमोद नाईक, सह संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. व ४) डॉ. रविंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही. सबब त्यांना नियमाप्रमाणे अनुपस्थित घोषित करण्यात आले.

१) डॉ. राजीव आर. मिश्रा, संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १: प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २५ नोव्हेंबर २०२२ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त मान्यतेकरिता सादर.**

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजी झालेल्या बैठक क्रमांक ६८ चे इतिवृत्त कार्यालयामार्फत सर्व सदस्य व संबंधीत विभागांना प्राधिकरणाच्या दिनांक ७/१२/२०२२ रोजीच्या पत्राद्वारे अवगत करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदरील इतिवृत्त मान्य करण्यात आले.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक २: प्राधिकरणाच्या दिनांक २५ नोव्हेंबर २०२२ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.**

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणास सादर करण्यात आला व त्यानुसार सदरील अहवालास **(प्रपत्र-अ)** प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली.

**विषय क्रमांक ३: शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार संचालनालय, कला शिक्षण, मुंबई यांच्या मार्फत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी कला अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालय निहाय पडताळणी/छाननी अद्याप पूर्ण झालेली नसल्याने महाविद्यालयांमार्फत "प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव" प्राधिकरणास सादर करण्यास असमर्थ असल्याचे बैठकीस उपस्थित पदवी कला अभ्यासक्रमाच्या महाविद्यालय प्रतीनिधींनी प्राधिकरणास अवगत केले. तद्नुषंगाने सदरील प्रकरणी महाविद्यालयांमार्फत प्रवेश मान्यतेचा परिपूर्ण प्रस्ताव विहित कालावधीमध्ये प्राप्त झाल्यानंतर प्रवेश मान्यते प्रकरणी पुढील निर्णय घेण्यात येईल, असे ठरविण्यात आले.

२. तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी व्यावसायिक तंत्र शिक्षण अभ्यासक्रमांच्या पदवी पदव्युत्तर हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या अहवालाचे बैठकीमध्ये अवलोकन करण्यात आले.

३. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी पदव्युत्त्र हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान या अभ्यासक्रमाच्या प्रवेश मान्यते प्रकरणी, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी सादर केलेल्या तपासणी/पडताळणी अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत तसेच प्राधिकरणाने विहित केलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, सदरील तपशील खालील प्रमाणे,-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | एकुण महाविद्यालये | शासकीय / अनुदानित / अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालये | | अमान्य प्रवेश | | निर्णय घेतलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-ब) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महाविद्यालये | प्रवेशित विद्यार्थी | महाविद्यालये | विद्यार्थी | महाविद्यालये | त्रुटी आढळलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | रद्द झालेले प्रवेश | मान्यता दिलेली विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १) | पदवी पदव्युत्त्र हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ |
| | **एकुण :** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **१** |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

उक्त तालिकेतील अभ्यासक्रम व महाविद्यालय निहाय तपशीलवार माहिती **प्रपत्र - 'ब'** मध्ये सोबत जोडलेली आहे. प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र **(प्रपत्र-ब मधील)** निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ नुसार) कार्यवाही करावी.

विषय क्रमांक ४: मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

(क) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींसंबंधी.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींसंबंधी (बैठक क्रमांक ६८ नंतर प्राप्त) राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षाच्या तंत्र शिक्षण, उच्च शिक्षण, वैद्यकीय शिक्षण व आयुष शिक्षण या विभागांनी प्राधिकरणास तपशील सादर केला, त्यानुसार सांगोपांग चर्चा करण्यात आली. या संदर्भात संबंधीत विभागाच्या परिक्षा समन्वयक यांनी तक्रारनिहाय केलेल्या कार्यवाहीचा तपशील प्राधिकरणास अवगत केला (प्रपत्र-क), केलेल्या कार्यवाहीची प्राधिकरणाने नोंद घेतली.

(ख) शैक्षिणिक वर्ष २०२१-२२ मधील त्रुटी अभावी ना मंजुर करण्यात आलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्राप्त पुनर्विलोकन याचिकेच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या समोर दिनांक २/१२/२०२२, ३/१२/२०२२ व १६/१२/२०२२ झालेल्या सुनावणी व तद्नुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या सुनावणी आदेशाचा तपशील प्राधिकरणास सादर करण्याबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील त्रुटी अभावी ना मंजुर करण्यात आलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्राप्त पुनर्विलोकन याचिकेच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या समोर दिनांक २/१२/२०२२, ३/१२/२०२२ व १६/१२/२०२२ झालेल्या सुनावणी व तद्नुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या सुनावणी आदेश प्रकरणी सादर करण्यात आलेल्या तपशीलाचे अवलोकन करण्यात आले. (प्रपत्र-ड)

प्रस्तूत प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्रमांक २(ड) मधील निर्णयानुसार त्याच पध्दतीने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रवेश प्रकरणी झालेल्या सुनावणीनुसार ज्या पुनर्विलोकन याचिका अर्ज फेटाळण्यात आलेल्या आहेत व त्यासंदर्भात प्राधिकरणाच्या निर्णयास अनुसरुन संबंधितांनी निवेदने सादर केलेली आहेत, अशी प्रकरणे संबंधित संचालनालयास पुनश्चः पडताळणीकरिता पाठविण्यात यावीत.

(ग) मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मधील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत होणाऱ्या परीक्षेस बसण्यास परवानगी देण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाचे दिनांक ५/१२/२०२२, ८/१२/२०२२, ९/१२/२०२२, १५/१२/२०२२ व १६/१२/२०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेली पत्रे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मधील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत होणाऱ्या परीक्षेस बसण्यास परवानगी देण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाचे दिनांक ५/१२/२०२२, ८/१२/२०२२, ९/१२/२०२२, १५/१२/२०२२ व १६/१२/२०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या पत्रांची नोंद घेण्यात आली.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(घ) **<u>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमास ज्या प्रवेशित व त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी विद्यापीठामार्फत होणाऱ्या परिक्षेस संबंधित विद्यार्थ्यांना बसण्यास परवानगी देण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाचे दिनांक १३/१२/२०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेले पत्र.</u>**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमास ज्या प्रवेशित व त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी विद्यापीठामार्फत होणाऱ्या परिक्षेस संबंधित विद्यार्थ्यांना बसण्यास परवानगी देण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणामार्फत दिनांक १३/१२/२०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या पत्राची नोंद घेण्यात आली.

(ङ) **<u>शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रथम वर्ष व्यावसायिक अभियांत्रिकी अभ्यासक्रमास रिक्त जागेवर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपुर येथे प्रवेशित कु. उमायसा अहमद यांचे मार्फत मा. उच्च न्यायालयाचे नागपुर खंडपीठ, नागपुर येथे याचिका क्रमांक ३८०१/२०१७ दाखल करण्यात आली आहे. सदर प्रकरणी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे संबंधित प्रवेशांबाबत संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांना कळविण्यात आलेले दिनांक ४/११/२०२२ रोजीचे पत्र.</u>**

प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक ४/११/२०२२ रोजीच्या पत्राची नोंद घेण्यात आली.

(च) **<u>पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, पुणे येथे MBA अभ्यासक्रमास संस्थेच्या रिक्त जागांवर ATMA, MAT व XAT या सामाईक प्रवेश परीक्षांच्या गुणांच्या आधारे ४९ विद्यार्थ्यांच्या प्रवेशांबाबत मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे दिनांक १२/०४/२०२२ रोजीच्या बैठकीतील इतिवृत्तामधील प्रस्तूत प्रकरणी मूद्दा क्रमांक ०४ मधील परिच्छेदामधील बदलाबाबत.</u>**

पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, पुणे येथील एम.बी.ए. अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १२/०४/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषयांकित प्रकरणी संबंधित परिच्छेद खालील प्रमाणे वाचण्यात यावा,-

> "या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संदर्भात संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक १२/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचा तपासणी अहवाल व संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचा दिनांक १९/०४/२०२२ रोजीचा तपासणी अहवाल प्राधिकरणास सादर केला. या तपासणी अहवालानुसार ४९ विद्यार्थ्यांच्या मुळ प्रमाणपत्रांची शासन मान्य नियमानुसार पडताळणी केली असता त्यापैकी ३४ विद्यार्थ्यांनी (प्रवेश परीक्षा वगळून) कागदपत्रांची पुर्तता केल्याचे नमूद केले आहे. उर्वरित १५ विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आलेल्या आहेत......."

(छ) **<u>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये मराठवाडा मित्र मंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे येथे विधी ५ वर्ष अभ्यासक्रमास प्रवेशित कु.श्रावणी संदेश दळवी या विद्यार्थिनीच्या अंतिम प्रवेश मान्यतेबाबत.</u>**

मराठवाडा मित्र मंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक विधी-५ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित कु. श्रावणी संदेश दळवी यांचे शैक्षणिक हित

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विचारात घेता, सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच महाविद्यालयाकडून अशा प्रकारची चूक भविष्यात पुन्हा झाल्यास महाविद्यालयाची मान्यता / संलग्नता रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, याची महाविद्यालयांने गांभीर्याने दखल घ्यावी. सदरील मान्यता ही एक वेळची विशेष बाब म्हणुन प्रदान करण्यात येत असल्याने या निर्णयाचा संदर्भ / आधार भविष्यात घेऊ नये. ही बाब स्पष्ट करण्यात येत आहे.

(ज) <u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता नव्याने मान्यता प्राप्त आयुर्वेद पदवी अभ्यासक्रमास महाविद्यालयातील प्रवेशाबाबत.</u>

आणि

(झ) <u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदव्युत्तर आयुर्वेद अभ्यासक्रम प्रवेशासाठी शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपुर व कै. केदारी रेडेकर आयुर्वेद महाविद्यालय, कोल्हापुर येथील जागांबाबत.</u>

आणि

(ञ) <u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी नर्सिंग अभ्यासक्रम प्रवेशासाठी नोंदणी प्रक्रियेस मुदतवाढ देणेबाबत.</u>

उक्त प्रकरणी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सादर केलेले दिनांक २७/०१/२०२३ रोजींच्या प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.

(ट) <u>राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून आयोजित सामाईक प्रवेश परीक्षांसाठी शासकीय महाविद्यालये व शासकीय संस्था यांमध्ये स्वतंत्र केंद्र सुरु करण्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करणेबाबत.</u>

प्रस्तूत प्रकरणी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सादर केलेल्या दिनांक २७/०१/२०२३ रोजींच्या प्रस्तावांमध्ये प्रस्तावित केल्यानुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकरिता शासकीय महाविद्यालये व शासकीय संस्था यांमध्ये स्वतंत्र केंद्र सुरु करण्याच्या अनुषंगाने उच्च शिक्षण विभागाकरिता रु. २० कोटी व तंत्र शिक्षण विभगाकरिता रु. ४३ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यास प्राधिकरणाची सीईटी कक्षास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि सदरील प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई, संबंधित संचालक व परिक्षा समन्वयक यांनी या संदर्भात नियमानुसार कायदेशीर बाबी तपासून विहित पध्दतीने प्रक्रिया करणे बंधनकारक राहील, तसेच यासाठी सीईटी कक्षाने संबंधित विभागाच्या सहमतीने SOP तयार करणे आवश्यक असेल, याची कृपया नोंद घ्यावी. प्रस्तूत प्रकरणी केलेल्या कार्यवाहीबाबत प्राधिकरणास अवगत करावे.

तसेच या संदर्भात सीईटी कक्षातील इतर विभागांचे प्रस्ताव असल्यास प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये मान्यतेकरिता सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(ठ) <u>अस्मिता कॉलेज ऑफ लॉ, विक्रोळी, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रवेशित कु. कशिशकुमार जैनेंद्रकुमार जैन यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.</u>

आणि

(ड) <u>न्यु लॉ कॉलेज, माहीम, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रवेशित कु. अमरसिंह कांबळे यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.</u>

आणि

(ढ) <u>मुंबई विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण या विभागातील बी.पी.ए.एड. अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रवेशित कु. कल्पेश प्रमोद कांबळे यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.</u>

उक्त प्रकरणी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सादर केलेले दिनांक २७/०१/२०२३ रोजींच्या प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.

(ण) <u>क्रिएटिव्ह एंटरप्रायझेस यांच्यामार्फत हाऊसकिपींग सर्व्हिसेसच्या कामासाठी प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही कार्यालयात कार्यरत कर्मचाऱ्यांची सफाईगार या पदवर कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्याबाबत.</u>

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही कार्यालयातील सफाईगार ही पदे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५-प्र.क्र.२७६/तांशि-४, दिनांक ४/०८/२०१५ नुसार मंजुर अथवा रिक्त नसल्यास, नव्याने पदे निर्माण करण्याबाबत प्राधिकरणाची मान्यता घेऊन तथा कामाची निकड लक्षात घेता सदरील पदे सेवापुरवठादारा मार्फत दरमहा रु. ९,०००/- मानधन या अटीवर विहित पध्दतीने भरण्याबाबत प्राधिकरणाचे निर्देश देण्यात आले आहेत.

(त) <u>डॉ. शशांक वाय. चिखलीकर, परीक्षा सल्लागार (उच्च् शिक्षण) यांच्या कंत्राटी तत्वावरील नियुक्तीस दिनांक ५/१२/२०२२ ते ३१/०१/२०२३ या कालावधीकरिता मुदतवाढ देणेबाबत.</u>

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कार्यरत डॉ. शशांक वाय. चिखलीकर, परीक्षा सल्लागार (उच्च शिक्षण) यांच्या कंत्राटी तत्वावरील नियुक्ती संबंधीत सीईटी कक्षाने सादर केलेल्या दिनांक २७/०१/२०२३ रोजीच्या प्रस्तावामध्ये प्रस्तावित केल्यानुसार प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि दिनांक ३१/०१/२०२३ (म.नं) कार्यालयातून कार्यमूक्त करण्यात यावेत.

तसेच आज रोजी घेण्यात आलेली प्राधिकरणाची क्रमांक ६९ वी बैठक मंगळवार, दिनांक १४/०२/२०२३ रोजी ठिक सकाळी ११:०० वा. पुन्हा पुढे सुरु करण्यात येईल.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

४०९/-

ARA/31st January 2023
Meeting No. 69

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : १/२/२३